# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत

दिांक २९-१२-२००९

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**२९/१२/२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२०) इतिवृत्त**

दि.२९/१२/२००९ रोजी **मा.सभापती श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे दुपारी ४.२५ वाजता 'वंदे मातरम्' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त श्री. पुरूषोत्तम भापकर, भा.प्र.से., नगर सचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.

०१. श्री. कटकटे सतीश विश्वनाथ
०२. श्री. गवळी रविकांत काशीनाथ
०३. श्री. पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
०४. श्री. सुरे सिताराम इसराम
०५. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
०६. श्री. कुचे नारायण तिलोकचंद
०७. श्री.घडमोडे भगवान देविदास
०८. श्री. सोनवणे कचरू श्रीपत
०९. श्रीमती मेहरून्नीसा खान
१०. सौ. मोमीन सफिया फिरदौस
११. श्री. शिंदे दामोधर माधवराव

**संवाद :**

श्री.विनायक पांडे : मागिल सर्वसाधारण सभेत अधिका-यांना पदमुक्त करण्याचा निर्णय घेतला त्याची अमलबजावणी का झाली नाही.

श्रीमती मोमीन सफिया : सदर बैठकीत एक महिला महापौर असतांना डायस समोर येवून स.सदस्यांनी मोठमोठ्याने बोलून जो गोंधळ केला त्याबद्दल आम्ही महिला निषेध करतो.

श्रीमती मेहरून्नीसा खान: सर्वसाधारण सभेत काही अधिका-यांना पदमुक्त करण्याचा निर्णय घेतला त्याची अमलबजावणी का झाली नाही नसता आम्ही संबधीत अधिका-यांच्या कॅबीन बंद करण्याचा विचार करू.

श्री.सतीष कटकटे : स.सदस्यांनी जो प्रश्न केला कुणाचा अपमान झाला सर्व खुलासा व्हावा.

श्री.विनायक पांडे : मागिल सर्वसाधारण सभेने जो पदमुक्त करण्याचा निर्णय घेतला त्यांची अंमलबजावणी का झाली नाही.

श्री.सतीष कटकटे : महिलांच्या बाबतीत सर्वसाधारण सभेत का प्रकार घडला खुलासा व्हावा. (याच वेळी सभागृहात स.सदस्य मोठमोठ्याने बोलतात.)

मा.सभापती : सर्वसाधारण सभेत महिला महापौर असल्यामुळे गोंधळ झाल्याने अपमान झाला या सभागृहातील महिला सदस्यांनी त्याबद्दल निषेध नोंदविला प्रत्येक वेळी विषयांतर करू नये.

श्री.सतीष कटकटे : त्या सभागृहात कुणाचा अपमान झाला नगरसचिवांनी खुलासा करावा.

मा.सभापती : सभेच्या अध्यक्षस्थानी मी आहे कोणत्या मुद्या बाबत खुलासा घ्यायचा किंवा आवश्यक वाटत असेल तर तो घेण्याचा अधिकार माझा आहे.

श्री.विनायक पांडे : मी प्रश्न उपस्थित केला त्याची आवश्यकता आपल्याला वाटत असेलच ज्या अधिका-यांना पदमुक्त केले ते आजही कार्यरत आहे.

मा.सभापती : या संदर्भात मा.आयुक्तांनी सविस्तर खुलासा करावा.

मा.आयुक्त : दिनांक २१-१२-२००९ च्या बैठकीत जो काही निर्णय झाला त्यावेळी आपण सर्वजण उपस्थित होता.प्रशासनाचे जे ठराव होते ते नगरसचिव यांचे मार्फत सभेत उप आयुक्त, शहर अभियता, शिक्षणाधिकारी, मुख्यलेखाधिकारी, आरोग्य वैद्यकीय अधि. असे ७ अधिका-यांच्या संदर्भात त्यांना एक वर्षाची मुदतवाढ देण्या बाबतचा विषय होता या पैकी ३ अधिका-यांना कार्यमुक्त करून परत शासन सेवेत पाठवावे.असा निर्णय झाला तो ठराव प्रशासनाकडे प्राप्त झाला त्या ठरावाच्या अनुषंगाने कार्यवाही करीत असतांनाच शासनाकडून कळविण्यात आले की जो ठराव पारीत झाला शहर अभियंत्यांच्या संदर्भात शासनाकडून असे समजले की शहर अभियंता हे पद यापूर्वी महापालिकेच्या सम्मतीवरून डेप्युटेशनवर मागविले होते त्यानुसार शासनाने या पदावर अधिका-यांची येथे नियुक्ती केली होती.जर शहर अभियंता पदावर बाहेरील शासनाने अधिकारी नको असेल तर महापालिका तसा निर्णय घेवू शकते.परंतु शहर अभियंता पदावर त्याची शासनाने नियुक्ती केली असल्यामुळे जोपर्यत शासन आदेश देत नाही तोपर्यत त्यांना कार्यमुक्त करू नये अशा सुचना मिळाल्या असल्यामुळे त्यांना कार्यमुक्त करण्यात आले नाही.जी बाब शहर अभियंता पदासाठी लागू झाली तीच बाब आपोआपच शिक्षणाधिकारी व उपआयुक्त यांना लागू झाला आहे तसा तातडीचा अहवाल शासनाकडे पाठविण्यात आलेला असून शासना आदेशाची वाट पाहत आहेत.

श्री.प्रशांत देसरडा : ज्या अधिका-यांना परत पाठवायचे आहे त्या संदर्भात शासनाकडून कोणत्या स्वरूपाचे आदेश प्राप्त झालेले आहे.

मा.सभापती : या संदर्भात शासनाकडून काही लिखीत आदेश आलेले आहे का माहिती दयावी.

मा.आयुक्त : शासनाकडून या संदर्भात तोंडी सुचना मिळाल्या होत्या.

श्री.प्रशांत देसरडा : एक टेक्नीकल प्रथा अशी आहे जर नेमणुक करण्याचा एखादा ठराव सर्वसाधारण सभेने मंजूर केला नसेल व शासनाने तोंडी निर्देश दिले असेल परंतु अशा अधिका-यांचा पगार देण्याचे समोर आले असेल जसे १४ महिण्यापासून संबधीत अधिकारी कार्यरत झाले १४ महिण्याच्या पगारा देणेसाठी सर्वसाधारण किंवा स्थायी समितीची मंजूरी घेतलेली

नाही.आतापर्यंत या अधिका-यांचे पेमेंन्ट कोणत्या नियमाने देण्यात आले व यापूढे देणार कसे तर शासन पेमेंन्ट देणार आहे का ?

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : जो विषय अधिका-यांच्या पदमुक्त करणे विषयी मांडला त्या बाबतीत मी हा ठराव विखंडीत करावा म्हणून शासनाकडे गेलो होतो. अपील केले प्रशासनालाही तसे कळविले.

श्री.प्रशांत देसरडा : याचा अर्थ आयुक्तांवर शासनाचा दबाव नाही नगरसेवकांचा दबाव आहे.शासनाचे बध्दल जे बोलले ते खोटे आहे आताच सदस्य म्हटले की आम्ही विखंडीत करणेसाठी अपील केले.शासनाला एवढी एकच महापालिका आहे का? शासनाला मंजूरी दयायची असेल तर देतात नसता ऑलरेडी शासन काही मंजूर करून पाठविलेले ठराव विखंडीत करतात.सदर ठराव विखंडीत केला म्हणून आम्हाला पत्र येते.परंतुं या ठरावाच्या बाबतीत जर शासन विंखडींत करू शकत असेल तर १० मिनिटात फॅक्स द्वारे कळवू शकत होते.

मा.सभापती : एखादा मंजूर झालेला ठराव विखंडीत करण्याचे अधिकार मा.महापौर , स्थायी समिती किंवा सदस्यांना आहेत का ?

नगरसचिव : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५१ विवक्षित प्रकरणामध्ये महानगरपालिकेचा किंवा इतर प्राधिका-यांचा कोणताही ठराव किंवा आदेश निलंबीत किंवा विखंडीत करण्याचा राज्य शासनाचा अधिकार

१. महापालिकेच्या किंवा इतर कोणत्याही प्राधिकाऱ्याच्या कोणत्याही ठरावाचे किंवा आदेशांचे कार्यान्वयन केल्याने किंवा महानगरपालिकेकडून किंवा अशा प्राधिका-याकडून किंवा तिच्या किंवा त्यांच्या वतीने जी कोणतीही गोष्ट केली जाण्याची शक्यता आहे किंवा जी करण्यात येत असेल ती केल्याने हा अधिनियम किंवा त्या वेळी अमलात असलेला इतर कोणताही कायदा याद्वारे किंवा तदन्वये देण्यात आलेल्या अधिका-याच्या विरूध्द किंवा मर्यादे बाहेर आहे किंवा शांततेचा भंग होण्याचा संभव आहे किंवा लोकांस किंवा व्यक्तीच्या कोणत्याही वर्गास किंवा गटास इजा किंवा त्रास होण्याचा संभव आहे किंवा लोकहिता विरूध्द नगरपालिका निधीचा दुरूपयोग किंवा गैरवापर किंवा अपव्यय होण्याचा संभव आहे असे राज्य शासनाचे मत झाल्यास, राज्य शासनास लेखी आदेशाद्वारे अशा ठरावाचे किंवा आदेशाचे कार्यान्वयन त्यामध्ये ते विनिर्दिष्ट करील अशा मुदतीसाठी किंवा मुदतीसाठी निलंबीत करता येईल किंवा अशी कोणतीही कृती करण्यास मनाई करता येईल अशा आदेशाची एक प्रत राज्य शासनाने महानगरपालिकेस व आयुक्तास व परिन व्यवस्थापकास ताबडतोब पाठविली पाहिजे.

२. उपरोक्त प्रमाणे आदेशाची प्रत मिळाल्यावर महानगरपालिकेस किंवा आयुक्तास किंवा परिवहन व्यवस्थापकास त्यास योग्य वाटेल तर उक्त आदेशाविरूध्द राज्य शासनाकडे अभिवेदन करता येईल.

३. राज्य शासनास,महानगरपालिकेकडून किंवा आयुक्तामडून किंवा परिवहन व्यवस्थापकाकडून मिळालेले कोणतेही अभिवेदन विचारात घेतल्यानंतर व तीस दिवसाच्या मुदतीत असे कोणतेही अभिवेदन मिळाले

नसेल त्या बाबतीत पोट-कलम (१)अन्वये त्याने दिलेला आदेश एक तर रद्द करता येईल, त्यात फेरबदल करता येईल किंवा तो कायम करता येईल किंवा प्रकरणाची सर्व परिस्थिती विचारात घेवून उक्त बाबीच्या संबधात, त्यांच्या मते जी न्याय्य किंवा इष्ट असेल अशी इतर कार्यवाही करता येईल पोट-कलम (१)अन्वये दिलेला कोणताही आदेश कायम करण्यात येईल त्या बाबतीत, राज्य शासनास ज्याच्या संबधात पोट-कलम (१) अन्वये दिलेला कोणताही आदेश कायम करण्यात येईल त्या बाबतीत, राज्य शासनास, ज्याच्या संसबधात पोट कलम (१) अन्वये निलंबन आदेश देण्यात आला होता असा महानगरपालिकेचा किंवा तिच्या प्राधिकाऱ्याचा ठराव किंवा आदेश हा विखंडीत झाला असल्याचे मानण्यात येईल असा निर्देश देता येईल.

४. पोट-कलम (३)अन्वये राज्य शासनाकडून केणताही आदेश देण्यात येईल त्या बाबतीत अशा आदेशाचे पालन करणे हे प्रत्येक पालिका सदस्याचे व महानगरपालिकेचे व संबधीत इतर कोणत्याही प्राधिकाऱ्याचे किंवा अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल.

मा.सभापती : शासनाकडून विंखंडीत झाल्याची प्रत प्राप्त झाली आहे का खुलासा द्यावा.

श्री.भगवान घडमोडे : येथे प्रशासनाचे नियम बॉडीने घेतलेल्या निर्णयानुसार नियम लागू पडतात हे सभागृह सर्वोच्च आहे की नाही.खुलासा करावा.

श्री.प्रशांत देसरडा : या संदर्भात शासनाकडे प्रशासनाने काय माहिती दिली आहे.

श्री.भगवान घडमोडे

मा.आयुक्त : जो ठराव मिळालेला होता तो पाठवला आहे. सर्वसाधारण सभा व या सभेचे काम याचा मान राखणे हे माझे काम आहे. प्रशासनाने शासनाकडे जी काही माहिती दिली त्याअनुषंगाने जो काही निर्णय घेतला ती कागदपत्र मला तातडीने दुरध्वनी करून मागविण्यात आल्याने त्या अनुषंगाने सद्यस्थितीचा अहवाल जे काही झाले ते पाठविले आहे.

श्री.भगवान घडमोडे : सभेने घेतलेला निर्णय सर्वोच्च आहे प्रशासनाने त्यानुसार कार्यवाही करावयास पाहिजे होती सभागृहाचा अवमान केला असे माझे मत आहे.

मा.आयुक्त : असे म्हणणे बरोबर नाही. सभागृहाचा असा कोणताही अवमान केला नाही. प्रशासनाचा रिपोर्ट शासनाकडे गेला आहे.

श्री.भगवान घडमोडे : शासनाने दुरध्वनी केला की प्रशासनाने कळविले होते.

मा.सभापती : मा.सचिवांनी दुरध्वनी केला होता.

श्री.भगवान घडमोडे : शासनाने दुरध्वनी कशाच्या अधारे केला.समजा मा.सचिवांनी सांगीतले स्टे येईल विखंडीत करणार आहे. एखादा अधिकारी आल्याने व कार्यमुक्त झाल्याने असे कोणते संकट कोसळले होते की शासन तो ठराव विखंडीत करू शकते.कोणते असे तातडीचे संकट या शहरावर उदभवले ज्यामूळे ठराव विखंडीत करण्याची वेळ येणार आहे. ठराव विखंडीत करण्याचे नेमके कारण काय स्पष्ट खुलासा करावा.

मा.आयुक्त : ठराव विखंडीत करावा असे प्रशासनानेही पाठविले नाही. सद्य:स्थिती जी आहे ती प्रशासनाने पाठविली आहे. शासनाकडे वस्तुस्थिती बाबत कळविले.

श्री.भगवान घडमोडे : शासनाकडून अद्याप काहीही आले नाही असे असेल तर सभागृहाच्या निर्णयाची अमलबजावणी का केली नाही.

मा.आयुक्त : या संदर्भात सांगितल्यानुसार शासनाचे काय म्हणणे आहे ते पहिल्यांदा ऐकावे लागेल.

श्री.भगवान घडमोडे : शासनाने काय म्हटले व प्रशासनाने अहवाल दिला त्यात शासनाकडे काय प्रपोज केले सभागृहाला दाखवावे.

मा.आयुक्त : ४ पानी अहवाल आहे आपण वाचून घेवू शकता.

श्री.प्रशांत देसरडा : किती पानाचा अहवाल दिला तो प्रश्न नाही आमचा मोजका प्रश्न आहे अमुक अधिकाऱ्यांना पाठवा व अमुकांना ठेवावे. मा.आयुक्तांनी सद्य:स्थितीचा अहवाल शासनाला कळविला त्यात काय नमूद केले.

मा.सभापती : आताच मा.आयुक्तांनी म्हटले ठराव विखंडीत करावा असे शासनाकडे पाठविलेल्या अहवालात म्हटले नाही.

श्री.प्रशांत देसरडा : माझा प्रतिनियुक्तीचा ठराव ठेवण्याची गरज नाही असे एका अधिकाऱ्यांनी मा.महापौर व महापालिकेला तसेच सहा.आयुक्त-१ यांना पत्र देवून कळविले असे अहवालात दिले का?

(याच वेळी सभागृहात मा.सभापती यांचे डायस समोर मोठमोठयाने स.सदस्य बोलतात)

श्री.प्रशांत देसरडा : अहवालात अधिकाऱ्यांची वागणूक व सभागृहाने घेतलेला निर्णय तो काही असेल.अशा दोन्ही बाजू मांडायला पाहिजे.संबधीत अधिकारी यांनी पत्र दिले. प्रतिनयुक्तीचा ठराव ६ महिण्याच्या आत घ्यायला पाहिजे होता.

मा.सभापती : ही सर्वसाधारण सभा नाही चर्चा करून निर्णय घेवू शकतो.स्थायी समितीचा विषय आहे का ?त्यावेळीच चर्चा करावयास पाहिजे होती.

(याच वेळी सभागृहात स.सदस्य मोठमोठयाने बोलतात. )

श्री.प्रशांत देसरडा : आमच्या प्रश्नावर चर्चा झाली नाही म्हणून त्या बैठकीत गोंधळ केला असे काही सदस्यांकडून ऐकायला मिळाले.

मा.सभापती : येथे सर्वांना मोकळीक आहेत का ,सर्वसधारण सभेतील चर्चा येथे कशासाठी ?

श्री.सतीष कटकटे : त्यावेळी चर्चा झाली नाही आता होवू द्यावी.

श्री.प्रशांत देसरडा : नियमानुसार ६-८ महिण्यात प्रस्ताव ठेवायला पाहिजे तो ठेवला नाही चुक झाली १४ महिण्यानंतर प्रस्ताव ठेवला हे पाठविलेल्या अहवालात प्रशासनाने नमुद केले का ?

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : ही चर्चा सर्वसाधारण सभेत व्हायला पाहिजे.

श्री.भगवान घडमोडे : या समितीत खर्चाचा विषय असतो गेल्या काही महिण्यापासून संबधीत अधिकाऱ्यांना अनधिकृत पगार देत आलेलो आहे. या सभागृहात चर्चा होणे आवश्यक आहे.

मा.सभापती : जर या संदर्भात प्रशासनाकडून माहिती हवी असेल तर पत्र देवून विचारू शकता.

श्री.प्रशांत देसरडा : अहवाल काय पाठविला यांची माहिती सदस्यांना दिली नाही प्रतिनियुक्तीचा नियमानुसार ठराविक कालावधीच्या आत ठेवायला पाहिजे होता तो न ठेवता

१४ महिण्यानंतर ठराव येतो जे अधिकारी नियमात बसत नसतांना त्यांचा पगार काढला गेला अधिकारी यांचा ठराव ठेवतांना नियमानुसार जे काही ६ महिणे असतील त्या कालावधीत ठेवायला पाहिजे तो ठेवला नाही १४ महिणे जे अधिकारी नियमात न बसता सुध्दा त्यांचा पगार काढला तसेच संबधीत अधिकारी यांनी अशा प्रकारचा ठराव सर्वसाधारण सभेला घेण्याची गरज नाही असे पत्र देवून कळविले याचा पाठविलेल्या अहवालात प्रशासनाने उल्लेख केला का ?

श्री.सतीष कटकटे : शासनाकडील अधिका-यांची येथे नियुक्ती दिल्या नंतर किती दिवसाच्या आत सर्वसाधारण सभेपूढे प्रस्ताव आणावा लागतो.

मा.सभापती : जे शहर अभियंता यांनी पत्र दिले त्यांचा उल्लेख केला पाहिजे.दिनांक ८-१२-१९८२ पासून आलेल्या एकाही अधिका-यांनी माझा प्रतिनियुक्तीचा ठराव सर्वसाधारण सभेला ठेवायची गरज नाही असे पत्र देवून मा.आयुक्तांना कळविले नाही शासनाकडे दिलेल्या अहवालात शहर अभियंता यांनी दिलेल्या पत्राचा उल्लेख केला काय प्रतिनियुक्तीचा प्रस्ताव किती दिवसाच्या आत सर्वसाधारण सभेपूढे यायला पाहिजे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : श्री.भागवत म्हस्के यांनी दिलेले पत्र वाचून दाखवावे १४ महिणे प्रस्ताव उशीरा का आला.

मा.सभापती : उशीरा ठराव ठेवण्या मागची चौकशी होईल जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाहीचे आदेश देणार आहेत श्री.म्हस्के यांचे प्रमाणे यापूर्वी कुणी मा.आयुक्तांना असे पत्र देवून कळविले होते का?हा खुलासा प्रशासनाने करावा.

श्री.भगवान घडमोडे : एका अधिका-यांचा विषय नाही.सभेचा अवमान झाला त्याबददल प्रशासनाचे काय मत आहे.

मा.सभापती : या प्रकरणात जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाहीचे आदेश देण्यात येईल कार्यवाही केली नाही तर पुन्हा या सभागृहात असे विषय घेणार नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : उशीरा प्रस्ताव ठेवून सर्वसाधारण सभेचा अवमान केला हे सत्य आहे का ?

श्री.प्रशांत देसरडा : श्री. म्हस्के यांनी दिलेले पत्राचा उल्लेख अहवालात केला नसेल तर त्यांचे बाबतीत काय निर्णय घेणार आहे.

मा.सभापती : प्रस्ताव प्रशासनाकडून येत असतो.जे पत्र अधिका-यांनी दिले त्यांचा उल्लेख शासनाकडे दिलेल्या अहवालात केला नसेल तर जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही होईल. सर्वसाधारण सभेत महिला महापौरांचा अवमान झाला म्हणून महिलांनी निषेध केला तो त्यांचा अधिकार आहे.

श्री.सतीष कटकटे : महापौरांचा काय अवमान झाला खुलासा करावा.

मा.सभापती : प्रत्येक स.सदस्यांना अभिनंदन, निषेध करण्याचा अधिकार आहे. प्रतिनियुक्तीवरील अधिकारी आल्यानंतर किती दिवसात त्यांचा ठराव सभेत यायला पाहिजे.

सहाय्यक आयुक्त-१ : शहर अभियंता पदी श्री.भागवत म्हस्के यांची महापालिकेमध्ये दिं.१५-१०-२००८ च्या शासन आदेशानुसार बदली झालेली आहे.त्यांना १८-१०-२००८ रोजी मध्यन्हापुर्व रूजू करून घेतले.दिं.७-१-०९ च्या स्थायी समितीमध्ये

त्यांची महापालिकेत प्रतिनियुक्ती कशी व कशा पध्दतीने रूजू करून घेण्यात आले या संदर्भात चर्चा झाली होती त्यावेळी खुलासा करण्यात आला होता की ६ महिण्याच्या संबधीत पदावर महापालिकेने नियुक्ती केली नाही तर कलम ४५(६) नुसार शासन प्रतिनियुक्तीवर कोणतेही अधिकारी पाठवू शकते तीच नियुक्ती महापालिकेने केली असे गृहीत धरले जाते. त्या अनुषंगाने त्याच वेळेस त्यांचे बाबतीत खुलासा झाला होता त्यांना कामावर रूजू करून घेण्यात आले.

मा.सभापती : नियमात व गरज नसतांना प्रतिनियुक्तीचा ठराव सर्वसाधारण सभेपूढे का पाठविला. दिशाभूल करणेसाठी पाठवला का? अनधिकृतरित्या पाठविला असेल तर तसा खुलासा करावा.

सहाय्यक आयुक्त-१ : तसे काहीही नाही, त्यावेळेसच्या खुलाशानुसार तत्कालीन आयुक्त यांनी स्पष्ट सुचना व त्यांची नोटींग आहे की हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याची गरज नाही. लिहिलेले आहे तेच मी सांगतो.

मा.सभापती : मा.आयुक्तांचे निर्देश असतांना का ठेवण्यात आला .

सहाय्यक आयुक्त-१ : या संदर्भात मा.आयुक्त यांचेशी तसेच मा.महापौर यांचेशी चर्चा केली प्रस्ताव ठेवण्याच्या सुचना दिल्या त्यानुसार ठेवलेला होता.

मा.सभापती : प्रस्ताव मा.महापौरांनी की प्रशासनाने ठेवला?

सहाय्यक आयुक्त-१ : ठराव प्रशासनातर्फे त्याच वेळेस ठेवण्यात आला होता परंतु त्यावेळच्या मा.आयुक्तांनी त्या बाबतीत निर्देश दिले की संबधीत अधिका-यांची नियुक्ती शासनाने केली आहे स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभेपूढे ठेवण्याची गरज नाही.

मा.सभापती : जो प्रस्ताव आला तो आता शासनाच्या निर्देशानुसार ठेवला होता का ?

सहाय्यक आयुक्त-१ : जे लिहिलेले आहे तोच खुलासा केला

श्री.प्रशांत देसरडा : आताच म्हटले प्रस्ताव ठेवण्याची गरज नाही प्रशासनाचे मत सभेला कळवायला पाहिजे होते संविधानिक पद भरण्याचा अधिकार कुणाचा प्रतिनियुक्तीवर घेणेसाठी सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्याची गरज आहे की नाही.

सहाय्यक आयुक्त-१ : शासनाने प्रतिनियुक्तीवर एखादे अधिकारी पाठविले त्यास सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावी. असे नियमात कुठेही नमूद नाही. ठरावाची गरज नाही.

श्री.प्रशांत देसरडा : असे असेल तर जो ४ पानी अहवाल शासनाला देण्याची गरज नव्हती. एखादे अधिकारी डेप्युटेशनवर येतात त्यांचा अपमान होतो एकमेकांत मतभेद निर्माण होतात त्या अधिका-यांना मुदतवाढ दयावी काहीचे मत देवू नये असे होते यामूळे या महापालिकेची प्रतिमा खराब होत आहे. ज्या अधिका-यांनी प्रतिनियुक्तीचा ठराव ठेवला त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

मा.सभापती : प्रतिनियुक्तीचा प्रस्ताव कुणी ठेवला माहिती घेण्याचे अधिकार या सभागृहाला आहे

श्री.सतीष कटकटे : मा.आयुक्त माहिती घेतील.

मा.सभापती :अधिकारावर गदा आणण्याचा प्रयत्न होतो मी पिठासीन अधिकारी आहे सदस्यांना त्यांचे मत मांडण्याचा व त्यावर निर्णय घ्यायचा अधिकार माझा आहे.

श्री.भगवान घडमोडे : सर्वसाधारण सभेला कळविणे गरजेचे आहे काय ?

सहाय्यक आयुक्त-१ : दिनांक २०-१०-२००८ रोजी श्री म्हस्के साहेब यांना रूजू करून घेतले त्या संदर्भात सर्व पदाधिकारी यांना कळविलेले आहे.

मा.सभापती : रूजू करून घेताना महापालिकेला कळविले असा उल्लेखही ठरावात का केला नाही.

सहाय्यक आयुक्त-१ : मा. पदाधिकारी यांना कळविलेले होते.

मा.सभापती : रूजू करू घेतल्याचे पदाधिका-यांना कळविले होते असे ठरावात दिलेले नाही.

श्री.भगवान घडमोडे : अधिका-यांना रूजू करून घेतले सभागृहाला कळविले नाही.हा सभागृहाचा अवमान आहे सभागृहात आमचा सुध्दा सन्मान राखला पाहिजे.ज्या गोष्टी प्रशासनाने आजपर्यत लपवून ठेवल्या त्याची संपूर्ण चौकशी करावी

श्री.प्रशांत देसरडा : सर्वसाधारण सभेला अधिकार नाही आताच स्पष्ट केले शहर अभियंता पदाच्या संदर्भात अधिका-यामध्ये वाद विवाद होतो या बाबतच्या बातम्या येवून यात महापालिकेची प्रतिमा खराब होते सर्वसाधारण सभेला अधिकार नसतांना प्रस्ताव ठेवला जातो अशा प्रकारचा ठराव ठेवून ज्यांना प्रतिनियुक्ती दयायची त्याचा व सभागृहाचा अपमान झालेला आहे.सर्वच स.सदस्य एका बाजूने मत मांडणारे नाही लगेच वृत्तपत्रात येते महापालिकेच्या सेवेतून अमूक अधिका-यांना कार्यमुक्त केले ज्यांना प्रतिनियुक्ती दयायची त्याची बदनामी होते.कुणाची बदनामी करण्याचे अधिकार कुणालाही नाही ज्यांनी प्रतिनियुक्तीचा प्रस्ताव ठेवला त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : १४ महिणे प्रस्ताव का आला नाही व आता कुणी मागवून घेवून सर्वसाधारण सभेलपूढे ठेवले होते याची चौकशी करावी.

श्री.विनायक पांडे : प्रशासनाने प्रस्ताव ठेवला येण्यास उशीर का झाला याची कोण व कशी चौकशी करणार,

श्री.प्रशांत देसरडा : संबधीत अधिकारी यांनी सर्वसाधारण सभेचा अपमान होईल असे पत्र प्रशासनाकडे दिले ते त्या अधिका-यांच्या हिताचे होते त्यामूळे विरोध व नाराजीचा सुर पसरला आहे.

श्री.विनायक पांडे : विषयांतर होत आहे.

मा.सभापती : अधिकार नसतांना प्रस्ताव का ठेवला.हे विचारण्याचा अधिकार सदस्यांना आहे तेवढाच माझा पण अधिकार आहे मी या सभागृहाचा पिठासीन अधिकारी आहे कुठलाही प्रश्न विचारू शकतो. निर्णय घेण्याचे अधिकार माझे आहे.

श्री.प्रशांत देसरडा : संबधीत अधिकारी यांनी चुकीचे पत्र दिले असा गैरसमज होत होता परंतु दिलेले पत्र बरोबर आहे त्या अधिका-यांचे मी अभिनंदन करतो परंतु गरज नसतांना का प्रस्ताव ठेवला.

मा.सभापती : सर्वसाधारण सभेकडे पाठविले दिशाभूल केली

श्री.प्रशांत देसरडा : कायदयाचे नियम आम्हाला माहित नव्हते.परंतु ज्यानी प्रस्ताव ठेवला जो अधिका-यांचा अपमान केला त्या संबधीतावर कार्यवाही व्हावी तोपर्यत बैठकीचे कामकाज होवू नये.

श्री.विनायक पांडे : संबधीतावर कार्यवाही व्हावी त्यानंतरच बैठकीचे कामकाज घ्यावे.

मा.सभापती : कोण अधिकारी आहे त्यांचे नाव सभागृहात प्रशासनाने स्पष्ट करावे.

मा.आयुक्त : संचिका बघूनच माहिती देता येईल.

मा.सभापती : संचिका मागवून घ्यावी.

श्री.प्रशांत देसरडा : संचिका मागवून घ्यावी तोपर्यत सभा तहकूब करावी.

श्री.विनायक पांडे

मा.सभापती : १५ मिनिटांच्या आत मा.आयुक्त यांनी संचिर्क्ड़ि मागवून घ्यावी तोपर्यत सभा तहकूब करण्यात येते.(वेळ सायं.५-१५ वा पून्हा सभेला ५-४० वा.सुरूवात)

श्री.विनायक पांडे : गरज नसतांना यापूर्वी प्रतिनियुक्तीचे ठराव येत होते प्रस्ताव ज्यांनी ठेवला त्यांचेवर कार्यवाही व्हावी

श्री.प्रशांत देसरडा : ठराव क्र.७९४ मध्ये संबधीत अधिकारी श्री.म्हस्के यांना सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई यांचे आदेशानुसार रूजू झाले माझे मते नगरविकास विभागाकडून आदेश होत असतात.तसेच या ठरावात प्रशासनाने प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर असे म्हटले याचा अर्थ सभागृहाला निर्णय घेण्याचा अधिकार आहे त्यानुसार सभागृहाने घेतलेल्या निर्णयानुसार कार्यवाही व्हावी.

श्री.विनायक पांडे : सर्वसाधारण सभेत घेतलेल्या निर्णयाची अमलबजावणी व्हावी गरज नसतांना ज्यांनी प्रस्ताव ठेवला त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : विषयपत्रिकेवर प्रस्ताव ठेवण्याचे अधिकार मा.महापौरांचे आहे.

श्री.विनायक पांडे : प्रशासनाने प्रस्ताव मा.महापौराकडे दाखल केला त्यानुसार विषयपत्रिकेवर आला यापूर्वी प्रतिनियुक्तीचे प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे का दिले जात होते

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : विषयपत्रिकेवर ठेवायचा की नाही हा अधिकार मा.महापौरांचा आहे.प्रशासनाने प्रस्ताव दिल्यानंतर मा.महापौरांकडे संचिका किती दिवस होती नेमकी त्याच दिवशी का समोर आली म्हणजे वाटेल तेंव्हा घ्यायचे नसता संचिका थांबवून ठेवायची असा प्रकार झाला का याची पण चौकशी व्हावी.

मा.सभापती : मा.आयुक्त यांनी या संदर्भात खुलासा करावा.

मा.आयुक्त : आताच सहाय्यक आयुक्त-१ यांनी महापालिकेतील अधिकारी कर्मचारी यांची नेमणूक व सेवेच्या अटी शर्ती या संदर्भात कलम ४५ वाचून दाखविले. त्याअनुषंगाने त्यांनी असा खुलासा केला की पोट कलम ५ अन्वये महापालिकेने एखादी नेमणूक करण्यास कसूर केल्यास शासनास अशी रिकामी जागा भरण्यासाठी योग्य अशा व्यक्तीची नेमणूक करता येईल. अशी नेमणूक सर्व प्रोव्हीजनासाठी महापालिकेने केली असे मानण्यात येईल.या अगोदर पोट कलम ५ बघीतले तर या कलमात असे म्हटले की उपनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही पदाची जागा रिकामी झाल्यास ज्या तारखेपासून ती

रिकामी झाली त्या तारखेपासून ४ महिण्याच्या आत आता या प्रमाणे बघीतले तर शहर अभियंता पद महापालिकेनेच भरले असे मानण्यात येईल अशा प्रकारची तरतुद यात आहे. श्री.भागवत म्हस्के यांची दि.१५-१०-२००८ च्या आदेशान्वये नेमणूक झाली ते दिं.१८-८-२००८ ला रूजू झाले. ९ जानेवारीला श्री.म्हस्के यांनी जर ड वर्ग महापालिकेमध्ये हे पद संविधानिक नसेल तर मला सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्याची शिफारस करावी असे पत्र तत्कालीन आयुक्त यांचेकडे दिले होते.तत्कालीन आयुक्त यांनी त्यावर असे आदेश केले की शासनाने डेप्युटेशन दिले आहे शासनाने यावर निणर्य घेतला आहे महापालिकेला या बाबत विचार करण्याची गरज नाही.अथवा स्थायी समिती शासनाच्या आदेशावर भाषण करू शकणार नाही हेझाल्यानंतर जसे आताच वाचून दाखविल्यानुसार व नगरसचिव यांचेशी पण चर्चा केली त्यांनी असे म्हटले की सन १९८८ पासून जे जे अधिकारी शासनाकडील महापालिकेत आले ते ते प्रथेनुसार महापालिकेच्या सभागृहाचा मान,आदर व सन्मान ठेवून प्रत्येक आलेले अधिकारी यांचे संदर्भात प्रतिनियुकतीचा प्रस्ताव सभागृहासमोर ठेवलेले आहे नियमात काही असले तरी सातत्याने सन १९८८ पासून त्या त्या अधिका-यांच्या प्रतिनियुक्तीच्या बाबतीत सभागृहासमोर ठेवले असून त्यावर निर्णय महापालिकेने घेतलेले आहे.दिं.११-६-२००९ रोजी तत्कालीन आयुक्त श्री. वैद्य साहेब असतांना हा विषय सभागृहा समोर ठेवण्याचे ठरवले होते.१९८८ पासून प्रथेप्रमाणे प्रस्ताव येत होते तो एक या सभागृहाचा सन्मान असून हा मुद्या यात समावेश होतो.तो मुद्या व इतर कागदपत्र पाहता हा विषय मुद्याम कुणी ठेवला असे यात अजिबात नाही.त्यामुळे कुणावर कार्यवाही करण्याचा प्रश्न उददभवत नाही.

श्री.सिताराम सुरे : शहर अभियंता पदाचा ठराव वगळता उर्वरीत ६ अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीचा ठराव आणण्याची गरज होती का?

मा.आयुक्त : तोच खुलासा केला की, प्रत्येक प्रतिनियुक्तीवर येणारे अधिका-यांच्या संदर्भात त्यांचा कालावधी बाजूला ठेवून प्रस्ताव मंजूरीसाठी सादर केलेले आहे.

श्री.विनायक पांडे : केवळ प्रथेसाठी ठेवत होतो असे प्रस्तावात नमूद केले जात होते का या प्रस्ताव तसे दिले का?

मा.सभापती : तसा उल्लेख नाही प्रस्ताव विचारार्थ निणर्यास्तव ठेवला असा स्पष्ट उल्लेख आहे.सर्वसाधारण सभेने निर्णय घेतलेला आहे त्यानुसार प्रशासन काय कार्यवाही करणार खुलासा करावा.

मा.आयुक्त : यात हायरारीटी आहे आयुक्त त्यानंतर मा.सभापती नंतर मा.महापौर खरे पाहता सर्वसाधारण सभेत हा विषय स्थायी समितीसमोर यायला नको फारसे ते योग्य असणार नाही सर्वसाधारण सभा नंतर शासन आहे जेव्हा शासन आयुक्तांना आदेश करते की असा निर्णय घेवू नये सर्व कागदपत्र शासनाकडे पाठवावे ते पाठविण्याशिवाय आयुक्तांना दुसरा पर्याय नाही.

श्री.सिताराम सुरे : सर्वसाधारण सभेचा विषय असला तरी स्थायी समितीच्या अधिकारानुसारच कर्मचा-यांचे पगार करतो असे माझे मत आहे असे असतांना या सभागृहाला मत मांडण्याचा अधिकार नाही का ?

मा.सभापती : पगारा संदर्भात बजेटमध्येच असते मान्य करतोच.

श्री.प्रशांत देसरडा : जेंव्हा कार्यवाहीचा मुद्या येतो त्यावेळी सभागृहाला चर्चा करण्याचे अधिकार नाही असे प्रशासन मत मांडते. बऱ्याच वेळेपासून चर्चा होत असून प्रतिनियुक्तीचे प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे आले यापूर्वीही अनेक ठराव आलेले होते काहीना घेतले काहींना परत पाठविले ज्यांना परत पाठवले शासनाने मंजूर केले आज त्याही अधिका-यांचा अपमान आहे.इतर ही महापालिकेत असे ठराव ठेवून मंजूरी दिली असेल मुंबई महापालिकेचे ॲक्ट वेगळे आहे.लोकमान्य टिळकांनी अंदोलन केले स्थानिक स्वराज्य संस्थेचे राज्य लागू करावे म्हणून मुंबईचे पहिले महापौर श्री.पटेल यांचे अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली व पुढे महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये ॲक्ट लागू झाला. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये पदाधिकारी असतात आता आयुक्ताच्या जागी त्यावेळी इंग्रजाचे अधिकारी हे गव्हर्नर म्हणून असत व सर्व अधिकार त्यांना होते.आयुक्त यांना शासनाने नियुक्त केले स.सदस्यांना नागरीकांनी निवडणून दिले` बीपीएमसी ॲक्ट होते ते आजही तेच आहे.त्या ॲक्ट मध्ये अनेक बाबी सर्वसाधारण सभेच्या अधिपत्त्याखाली नसतांना देखिल जे ठराव आणले व विषेश म्हणजे सर्वसाधारण सभेच्या निदर्शनास आणून न दिल्यामूळे हा गोधळ निर्माण झाला. आतापर्यंत गरज नसतांना जे ठराव ठेवले त्या संबधीतावर कार्यवाही करावी शहर अभियंता हे पद महापालिकेच्या अधिका-यामधून तात्काळ भरावे जो ठराव पास केला तो शासनाने विखंडीत केला महापालिकेच्या अधिका-यामध्यून हे पद भरावे यास सभागृहाने मंजूरी दिली त्यामूळे असे प्रस्ताव सभागृहासमोर येणे गरजेचेच आहे कायदयाचा अर्थ जसा लावला तसा लागतो.

मा.सभापती : प्रथेप्रमाणे प्रस्ताव सादर केला असे प्रशासनाने म्हटले आहे.

श्री.विनायक पांडे : प्रथेसाठी प्रस्ताव ठेवतो असे ठरावात नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : शासनाकडील आलेले अधिकारी रूजू करून घ्यायचे की नाही सभागृह ठरविते ही प्रथा येथे लावून घेतलेली आहे परंतु नांदेड महापालिकेत शासनाकडून आलेला कोणताही प्रस्ताव सर्वसाधारण सभा किंवा स्थायी समिती समोर येत नाही.सर्वसाधारण सभेत या संबधी निर्णय झाला येथे चर्चा नको.

श्री.भगवान घडमोडे : आताच म्हटले प्रथेप्रमाणे गरज नसतांना प्रतिनियुक्तीचे प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवले जात होते चुकीचा पायंडा पडलेला आहे होत असलेली चूक सुधारावी जर मंजूर किंवा नामंजूर केले तरी अमलबजावणी होत नसेल तर योग्य नाही हे सभागृह कशासाठी आहे?सभेने घेतलेल्या निर्णयाची अमलबजावणी होणार की नाही.

श्री.विनायक पांडे : अमलबजावणी होणार नसेल तर सर्व नगरसेवकांचा अपमान समजून आम्ही सभात्याग करतो.

(याच वेळी सभागृहातील स.सदस्य श्री. विनायक पांडे, प्रशांत देसरडा, श्री.सिताराम सुरे श्री.भगवान घडमोडे, श्री.नारायण कुचे, श्री.प्रल्हाद निमगांवकर हे सभात्याग करून सभागृहाच्या बाहेर निघून जातात.)

मा.सभापती : दिनांक २१-१२-२००९ च्या सभेत शासनाकडील अधिकारी यांना मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव होता. हा विषय सर्वसाधारण सभेचा असून त्यावर फार वेळ चर्चा झाली प्रशासनाच्या वतीने मा.आयुक्त यांनी खुलासाही केला या सभागृहातील सदस्यांचे असे मत होते की सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयाची अमलबजावणी होणार की नाही या बाबतचे उत्तर प्रशासन देवू शकले नाही.त्यामूळे बरेच स.सदस्य सभात्याग करून सभागृहातून बाहेर गेलेले आहे.त्यांचे नावाची तसेच सर्वसाधारण सभेत त्या दिवशी महापौर डायस समोर जो प्रकार झाला त्यांचा निशेष महिला सदस्यांनी केलेला आहे या दोन्हीची नोंद इतिवृत्तात घेण्यात येते.प्रशासनाची भुमिका प्रशासनाने स्पष्ट केली मा.आयुक्त यांनी असे म्हटले की शासनाने दुरध्वनी वरून या प्रस्तावा विषयी माहिती मागविली होती ती प्रशासनाने शासनास लेखी स्वरूपात दिली. असे प्रस्ताव सर्वसाधारण सभेत घेण्याची गरज नाही असा खुलासा केला हे सुध्दा कबुल केले की १९८८ पासून जे शासनाकडील अधिकारी येतात त्यांची सेवा येथे ठेवायची की नाही या बाबत सर्वसाधारण सभेने निर्णय घेतले त्यानुसार निर्णय प्रशासनाने घेतले हे मान्य केले.या प्रकरणी सर्व अधिकार मा.आयुक्त यांना देण्यात येते त्यांनी योग्य जी नियमानुसार कार्यवाही असेल ती करावी.

**विषय क्र. २७२ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, सिडको एन-६ येथील साईनगर व्यापारी संकुला शेजारी दक्षिणेकडील खुली जागा ज्याचे क्षेत्रफळ २१.१३ चौ.मी. भाडेपट्ट्याने मिळणे बाबत अर्जदार श्री.भागचंद पारख यांनी अर्ज देवून विनंती केलेली आहे. सदरील ठिकाणची जागा भाडेपट्ट्यावर देण्यास दिनांक २४.११.२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेत विषय क्र.१९८ अन्वये प्रती माह रू.२००/- प्रमाणे ३३ वर्षाकरीता देवून ह्या जागेवर सबंधीताने स्वखर्चाने बांधकाम करून घेणेस मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु प्रचलित पध्दतीनुसार सदरील जागेचे सिध्द शिघ्र गणकानुसार २१.१३ चौ.मी. करीता प्रति चौ.मी. प्रती माह भाडे रू.३६/- प्रतीमहा रू.७६१/- व प्रती वर्ष रू.९१३२/- आकारणे योग्य.

करीता सदरील जागा भाडेपट्ट्यावर दिल्यास प्रथमतः एक वर्षाचे आगाऊ भाडे, मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम, सेवा शुल्क व अकृषी कर आकारून भाडेपट्ट्याने देणे योग्य.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.सतीश कटकटे : दि.२४.११.२००९ च्या स्थायी समितीने मान्यता दिल्यानुसार २००/- रूपये प्रतिमाह भाडे आकारण्यात यावे.

मा. सभापती : प्रती माह २००/- रूपये भाडे आकारण्यास मान्यता देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सिडको एन-६ येथील साईनगर व्यापारी संकुला शेजारी दक्षिणेकडील खुली जागा ज्याचे क्षेत्रफळ २१.१३ चौ.मी. भाडेपट्ट्याने मिळणे बाबत विनंती केल्यानुसार दिनांक २४.११.२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेत विषय क्र.१९८ अन्वये प्रती माह रू.२००/- प्रमाणे ३३ वर्षाकरीता देवून ह्या जागेवर सबंधीताने स्वखर्चाने बांधकाम करून घेणेस मान्यता दिल्यानुसार श्री.भागचंद पारख प्रती माह रू.२००/- भाडे आकारणी करून इतर अटी-शर्तीनुसार भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. २७३ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, न्यु उस्मानपुरा येथील रिलायन्स फ्रेश जवळ महानगरपालिकेची मुतारी अस्तित्वात असून सदर मुतारी २४.०० मी. रूंद व १५.०० मी. रूंद रस्त्याच्या जंक्शन जवळ येत आहे. या मुतारीमुळे होणाऱ्या वाहतुकीस अत्यंत अडथळा निर्माण होत आहे. तसेच या मुतारीचा वापर हा कमी प्रमाणात होत आहे. त्यामुळे या परिसरात विनाकारण अस्वच्छता राहते. सदरील मुतारी निष्काशीत करणे करीता मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे.

तरी न्यु उस्मानपुरा येथील रिलायन्स फ्रेश समोरील महानगरपालिकेची मुतारी निष्काशीत करणेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न्यु उस्मानपुरा येथील रिलायन्स फ्रेश समोरील महानगरपालिकेच्या अस्तित्वातील मुतारीमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून या मुतारीचा वापर हा कमी प्रमाणात होत असल्यामुळे सदरील मुतारी निष्काशीत करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. २७४ :</u>**

उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, महानगरपालिकेच्या मालकीचे मो. हर्षनगर येथील हॉलचे क्षेत्रफळ १७९.३५चौ.मी. हे हुमेरा सुशिक्षित बेरोजगार सेवा सह. संस्था मर्यादीत यांना भाडे तत्वावर देणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

त्यानुसार सदरील जागेसाठी रक्कम रू.८०/- प्रती चौ.मी. प्रतिमाह प्रमाणे व मासिक भाड्याच्या बारा पट अनामत रक्कम, सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी. प्रति माह व अकृषी कर रू.७.६८ प्रति वर्ष प्रमाणे मालमत्ता कर आणि इतर कर संबंधीत भोगवटा धारकांनी भरणा करावे लागेल.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

महानगरपालिकेच्या मालकीचे मो. हर्षनगर येथील हॉलचे क्षेत्रफळ १७९.३५चौ.मी. हे हुमेरा सुशिक्षित बेरोजगार सेवा सह. संस्था मर्यादीत यांना सदरील जागेसाठी रक्कम रू.८०/- प्रती चौ.मी. प्रतिमाह प्रमाणे व मासिक भाड्याच्या बारा पट अनामत रक्कम, सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी. प्रति माह व अकृषी कर रू.७.६८ प्रति वर्ष प्रमाणे मालमत्ता कर आणि इतर कर संबंधीत भोगवटा धारकांनी भरणा करावे या अटीवर भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९६ नाथपुरम येथे बॅडमींटन हॉल बांधण्याच्या कामाकरीता रक्कम रू.१४,६६,८२६/- चे अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती विषय क्र.६० दिनांक १.७.२००८ अन्वये मान्यता प्राप्त झालेली असून सदरील काम श्री.काझी मुबारीझुद्यीन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.४% जास्त दराने करून घेण्यासही विषय क्र.२१२ दिनांक १३.२.२००९ अनवये मान्यता प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सध्या सदरील काम प्रगतीपथावर असून प्रत्यक्ष काम करतेवेळी मुळ प्रस्तावात असलेल्या बाबींमध्ये वाढ होणार आहे व या करीता रक्कम रू.२.५० लक्ष इतका वाढीव खर्च लागणार आहे.

तरी या कामाकरीता लागणाऱ्या रक्कम रू.२.५० लक्ष च्या वाढीव खर्चाचा प्रस्ताव तसेच वाढीव काम श्री.काझी मुबारीझुद्यीन यांचेकडून मंजूर दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

पस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ९६ नाथपुरम येथे बॅडमींटन हॉल बांधण्याच्या कामात प्रत्यक्ष काम करतेवेळी मुळ प्रस्तावात असलेल्या बाबींमध्ये वाढ होणार असल्याने या कामाकरीता लागणाऱ्या रक्कम रू.२.५० लक्ष च्या वाढीव खर्चास तसेच वाढीव काम श्री.काझी मुबारीझुद्यीन यांचेकडून मंजूर दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७६ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्या मान्यतेने उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध व्यापारी संकुलातील काही दुकाने बऱ्याच वर्षापासून रिक्त असून सदर दुकाने भाडेतत्वावर देण्यासाठी बऱ्याच वेळा जाहीर प्रगटन (निविदा) देखील कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद मिळालेला नाही.

करीता सदरील दुकानांची जायमोक्यावर जाऊन प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आली असता सदरील दुकानाची सद्यःस्थिती बघता यापुर्वी भाडे समितीने आणि मा.स्थायी समितीने यापुर्वी मान्य केलेल्या दरामध्ये काही प्रमाणात दुरूस्ती करून सुधारीत भाडे निश्चित केल्यास महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढण्याच्या दृष्टीने सदरील कानाचे भाडे आणि अनामत दर सुधारीत करून त्यास मान्यता मिळाल्यास प्रचलित नियमानुसार भाडे आणि अनामत रक्कम तसेच सेवा शुल्क व अकृषी कर नियमाप्रमाणे घेवून दुकाने तीस वर्षांसाठी भाडेतत्वावर देण्यासाठी स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात देवून निविदा मागविण्यात येतील.

**व्यापारी संकुलाचे प्रस्तावित अनामत आणि प्रती माह भाडे दर दर्शविणारा तक्ता.**

| अ. क्र. | व्यापारी संकुलाचे ठिकाण | मा.स्थायी समितीने मान्य केलेले दर | | प्रस्तावित भाडे/अनामत रक्कम (सुधारीत) | |
|---|---|---|---|---|---|
| | | भाडे प्रती चौ.मी. प्रती माह रूपये | अनामत रक्कम प्रती चौ.मी. | भाडे प्रती चौ.मी. प्रती माह रूपये | अनामत रक्कम प्रती चौ.मी. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | सादिया टॉकीज मागील मार्केट | ७५/-<br>६०/-<br>४५/- | २०००/- | .६०/-<br>४५/-<br>३०/- | १०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २. | पिया मार्केट तळ मजला<br>पिया मार्केट पहिला मजला | १५५/-<br>७५/- | ३०००/-<br>१५००/- | १५५/-<br>७५/- | ३०००/-<br>१५००/- |
| ३. | संजयनगर | ७१/- | १७००/- | ५०/- | १०००/- |
| ४. | हर्षनगर | १५५/- | १५००/- | ५०/- | ५००/- |
| ५. | जाफरगेट | १००/- | १५००/- | ७५/- | १०००/- |
| ६. | एकनाथनगर | ३००/- | ७५००/- | ३००/- | ७५००/- |
| ७. | कबाडीपुरा | १५५/- | १५००/- | १००/- | १०००/- |
| ८. | जय टॉवर | १२५/- | २०००/- | १००/- | १५००/- |
| ९. | सब्जीमंडी | १५०/- | ४०००/- | १००/- | २०००/- |
| १०. | चिकलठाणा | रू.१२८/- | रू.२५००/- | रू.१००/- | रू.१५००/- |
| ११. | शहागंज | रू.५९/- | रू.६१००/- | रू.५०/- | रू.५०/- |
| १२. | नाथ सुपर मार्केट दुसऱ्या मजल्यावरील रिक्त हॉल | -- | -- | रू.७५/- | रू.१०००/- |

या प्रमाणे मान्यता मिळाल्यास प्रस्तावित दुकाने/रिक्त हॉल भाडेतत्वावर देण्या संदर्भाने जाहीर प्रगटन/निविदा प्रसिध्द करून सदरील प्रकरणी कार्यवाही करता येऊ शकेल.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : ३० वर्षासाठी भाडेतत्वावर न देता ३ वर्षासाठी करावे. त्यानंतर त्यांना मुदतवाढ देता येईल.

मा. सभापती : तशी भाडेपट्ट्यामध्ये तरतूद करावी लागेल. प्रथम भाडेपट्टा ३ वर्षासाठी करायचा, त्यानंतर पुढील मुदतवाढ देता येईल. या ठरावात काही बदल करावयाचे आहे. नगर सचिव यांनी वाचून दाखवावे.

नगर सचिव : विषय क्र.२७६ संदर्भात मा.सभापती यांनी रूलींग दिले आहे त्यानुसार हा स्थायी समिती सभागृहाचा निर्णय होत आहे. प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध व्यापारी संकुलातील दुकाने/हॉल हे बऱ्याच वर्षापासून रिक्त असल्याने मनपाचे उत्पन्न बुडत आहे. तेव्हा सदरील दुकानाचे प्रस्तावित (सुधारीत) दरास मान्यता देऊन काही अर्जदारांनी विनंती अर्ज केल्याने आणि मनपाच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने अनुक्रमे सादिया टॉकीज मागील व्यापारी संकुलातील दुकान क्र.७-बी ही श्री.अफसरखान अजिजखान आणि दुकान क्र.१७-ए ही श्रीमती सुमय्या बानो अब्दुल अजीम यांना प्र.चौ.मी.प्रती माह रू.३०/- प्रमाणे, कबाडीपुरा व्यापारी संकुलातील दुकान क्र.१ ही श्री.रियाज शाह खान आजम शाह खान यांना प्र.चौ.मी.प्रती माह रू.१००/- या प्रमाणे, हर्षनगर व्यापारी संकुलातील तीन दुकाने (बांधल्यापासून ते आजपर्यंत रिक्त असल्याने आणि अनेक वेळा जाहीर निविदा प्रसिध्द करून देखील प्रतिसाद न मिळाल्याने) हे श्रीमती निलोफर बानो हाफिज रईस यांना प्र.चौ.मी.प्रती माह रू.५०/- या प्रमाणे, आणि नाथ सुपर मार्केट येथील दुसऱ्या मजल्यावरील रिक्त हॉल कॅबीनसह (अंदाजे चार-पाच वर्षापासून रिक्त असल्याने) हे श्री.बाळू सखाराम स्वामी यांना प्र.चौ.मी.प्रती माह रू.७५/- या प्रमाणे मासिक भाडे आणि प्रत्येकी

(अर्जदारास) प्रती माह भाड्याच्या १२ पट अनामत रक्कम आणि नियमाप्रमाणे सेवा शुल्क, अकृषिक कर, मालमत्ता व इतर कर घेवून ०३ वर्ष (तीन वर्ष) मुदतीच्या भाडेतत्वावर देण्यास तसेच उर्वरित दुकाने तात्काळ जाहिर निविदा प्रसिध्द करूने भाडे तत्वावर देण्याची कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते. असा समितीचा निर्णय लेखी स्वरूपात समोर आलेला आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध व्यापारी संकुलातील दुकाने/हॉल हे बऱ्याच वर्षापासून रिक्तच असल्याने मनपाचे उत्पन्न बुडत आहे. तेव्हा सदरील दुकानाचे प्रस्तावित (सुधारीत) दरास मान्यता देऊन काही अर्जदारांनी विनंती अर्ज केल्याने आणि मनपाच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने अनुक्रमे सादिया टॉकीज मागील व्यापारी संकुलातील दुकान क्र.७-बी ही श्री.अफसरखान अजिजखान आणि दुकान क्र.१७-ए ही श्रीमती सुमय्या बानो अब्दुल अजीम यांना प्र.चौ.मी.प्रती माह रू.३०/- प्रमाणे, कबाडीपुरा व्यापारी संकुलातील दुकान क्र.१ ही श्री.रियाज शाह खान आजम शाह खान यांना प्र.चौ.मी.प्रती माह रू.१००/- या प्रमाणे, हर्षनगर व्यापारी संकुलातील तीन दुकाने (बांधल्यापासून ते आजपर्यंत रिक्त असल्याने आणि अनेक वेळा जाहीर निविदा प्रसिध्द करून देखील प्रतिसाद न मिळाल्याने आणि सदरील दुकाने मोडकळीस आले असल्याने कार्यालयातर्फे दुरूस्ती करून देऊन) हे श्रीमती निलोफर बानो हाफिज रईस यांना प्र.चौ.मी.प्रती माह रू.५०/- या प्रमाणे, आणि नाथ सुपर मार्केट येथील दुसऱ्या मजल्यावरील रिक्त हॉल कॅबीनसह (अंदाजे चार-पाच वर्षापासून रिक्त असल्याने) हे श्री.बाळू सखाराम स्वामी यांना प्र.चौ.मी.प्रती माह रू.७५/- या प्रमाणे मासिक भाडे आणि प्रत्येकी (अर्जदारास) प्रती माह भाड्याच्या १२ पट अनामत रक्कम आणि नियमाप्रमाणे सेवा शुल्क, अकृषिक कर, मालमत्ता व इतर कर घेवून ०३ वर्ष (तीन वर्ष) मुदतीच्या भाडेतत्वावर देण्यास तसेच उर्वरित दुकाने तात्काळ जाहिर निविदा प्रसिध्द करूने भाडे तत्वावर देण्याची कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्रीमती मेहरून्नीसा खानः ऐनवेळेचे सर्व प्रस्ताव मंजूर करावे.

मा.सभापती : ऐनेवेळचे प्रस्तावांना मंजूरी देण्यात येते.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. २७७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ९५ पदमपुरा अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामासाठी रू. ८.०० लक्षची तरतुद असून रामदेवजी बाबा चौक ते दिवेकर गॅरेज पर्यंत नाली दुरूस्त करणेच्या कामासाठी रू.५.०० लक्षची तरतुद अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. या भागात ड्रेनेज चोकअप होण्याच्या वारंवार तक्रारी असून त्यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. तसेच घाण पाणी वाहुन जाण्यासाठी नाली दुरूस्तीचे काम तातडीने करून घेणे गरजेचे आहे. नागरीकांचे तक्रारी असुन हे काम तातडीने करून घेणे बाबत संबंधीत प्रभागाचे स.सदस्य तथा सभागृह नेता यांची मागणी आहे. वरील बाबी लक्षात घेता अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार खालील दर्शविलेली कामे मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.९५ पदमपुरा येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे - ८.०० लक्ष

२. पदमपुरा भागात रामदेवजी बाबा चौक ते दिवेकर गॅरेज पर्यंत नाली दुरूस्त करणे - ५.०० लक्ष

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : सतीश कटकटे अनुमोदक : मेहरून्नीसा खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ९५ पदमपुरा अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व रामदेवजी बाबा चौक ते दिवेकर गॅरेज पर्यंत नाली दुरूस्त करणे आवश्यक असून नागरीकांचे आरोग्याचा विचार करता घाण पाणी वाहुन जाण्यासाठी नाली दुरूस्तीचे काम तातडीने करून घेणे गरजेचे असल्यामुळे अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार खालील दर्शविलेली कामे मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

१. वॉर्ड क्र.९५ पदमपुरा येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे - ८.०० लक्ष

२. पदमपुरा भागात रामदेवजी बाबा चौक ते दिवेकर गॅरेज पर्यंत नाली दुरूस्त करणे - ५.०० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ९३ अंतर्गत रस्त्यांवर अनेक खड्डे पडलेले असून या रस्त्यावरून वाहनधारक/पादचाऱ्यास चालणे कठीण झालेले आहे. त्यामुळे या रस्त्यावर खडी-मुरूम टाकून पॅचवर्कचे काम व साईडबम लेवलींगचे काम तातडीने करून घेणे आवश्यक आहे. या कामासाठी रू.२.५० लक्ष खर्च अपेक्षीत आहे. सदरचे काम तातडीने करून घेण्याकरीता मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.९३ अंतर्गत रस्त्याचे खडी मुरूम टाकून पॅचवर्क करणे व साईडबम लेवलींग करणे - २.५० लक्ष

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : मेहरून्नीसा खान अनुमोदक :सौ. सफिया मोमीन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ९३ अंतर्गत रस्त्यांवर खडी-मुरूम टाकून पॅचवर्कचे काम व साईडबम लेवलींगचे काम तातडीने करून घेणे आवश्यक असल्यामुळे अंदाजपत्रकीय रक्कम रू.२.५० लक्ष चे काम तातडीने करून घेण्याकरीता मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियामानुसार कार्यवाही करावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका एन-६ सिडको व्यापारी संकुला शेजारी म.न.पा. ची अनियमित आकाराची व्यापारी संकुलास लागून उत्तरेला १५x२० आकाराची रिकामी जागा आहे. सदर जागा श्री.अभिजित विष्णु लोखंडे यांनी व्यवसायासाठी मागणी केलेली आहे. ते सुशिक्षित बेरोजगार असून त्यांना उपजिविकेसाठी व्यवसाय करणेकरीता प्रस्तावित जागा दीर्घ

मुदतीसाठी त्यांना भाडेतत्वावर देण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर. सदर व्यापारी संकुलाचे दक्षिण बाजुस यापुर्वी जागा दिली असून त्याच दराने भाडे आकारण्यात यावे.

सुचक : मेहरून्नीसा खान अनुमोदक :सौ. सफिया मोमीन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मनपा एन-६ सिडको व्यापारी संकुला शेजारी अनियमित आकाराची व्यापारी संकुलास लागून उत्तरेला १५x२० आकाराची रिकामी जागा श्री.अभिजित विष्णु लोखंडे यांनी व्यवसायासाठी मागणी केल्यानुसार त्यांना उपजिविकेसाठी व्यवसाय करणेकरीता प्रस्तावित जागा सदरील व्यापारी संकुलाचे दक्षिण बाजुस यापुर्वी दिलेल्या जागेच्या दराने भाडे आकारणी करून दीर्घ मुदतीसाठी भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३७ अंतर्गत विविध ठिकाणच्या ड्रेनेज लाईन गत ३०-४० वर्षापासूनच्या असून त्या अत्यंत खराब झालेल्या आहेत. त्या तात्काळ बदलणे आवश्यक आहे. या कामासाठी महानगरपालिकेच्या सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात रू.१०.०० लक्ष ची आर्थिक तरतुद उपलब्ध आहे. वरील बाबी लक्षात घेता अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार खालील दर्शविलेली कामे मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारामार्फत अंदाजपत्रकीय दरावर तातडीने करून घेण्याच्या मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.३७ पैठणगेट दलालवाडी, स्वातंत्र्य सैनिक कॉलनी, एसबी कॉलनी पुर्व व पश्चिम येथे विविध ठिकाणी जलनि:सारण वाहिनी टाकणे.

सुचक : सतीश कटकटे अनुमोदकः भगवान घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.३७ अंतर्गत विविध ठिकाणच्या ड्रेनेज लाईन गत ३०-४० वर्षापासूनच्या असून त्या अत्यंत खराब झाल्याने तात्काळ बदलणे आवश्यक असल्यामुळे अर्थसंकल्पातील उपलब्ध रक्कम रू.१०.०० लक्ष च्या तरतुदीस अधीन राहून वॉर्ड क्र.३७ पैठणगेट दलालवाडी, स्वातंत्र्य सैनिक कॉलनी, एसबी कॉलनी पुर्व व पश्चिम येथे विविध ठिकाणी जलनि:सारण वाहिनी टाकणेचे काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारामार्फत अंदाजपत्रकीय दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८१ :**

दिनांक ४/७/२००९ रोजी झालेल्या स्थायी समिती मध्ये ठराव क्र.३२ मधील परिच्छेद १ नुसार अल्तमश कॉलनी येथील मंजूर रेखांकनातील सामाजिक सभागृह खाजगी व्यक्तींना भाड्याने देण्यासंबंधीचा ठराव मंजुर करण्यात आला आहे. परंतु रेखांकनातील स्थानिक प्लॉट धारकांनी सदरील सामाजिक सभागृह नागरिकांच्या वापरासाठी ठेवण्यात यावी अशी मागणी केलेली आहे. तसेच म.न.पा. च्या कलम ७९ फ मधील पोटकलम अ आणि ब नुसार ही जागा खाजगी व्यक्तींना किंवा कोणत्याही संस्थेस देऊ नये अशी देखील मनाई केलेली आहे.

करीता अल्तमश कॉलनी येथील सरदार अवतारसिंग सोधी यांच्या मंजुर रेखांकनातील खुल्या जागेवरील सामाजिक सभागृह भाडेपट्ट्याने देण्याचा निर्णय रद्द करण्यात यावा. तसेच मालमत्ता विभागातर्फे यासंबंधी होत असलेली कार्यवाही रद्द करावी.

करीता प्रस्ताव स्थायी समिती सभेत मंजुरीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सादर.

सुचक : डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर अनुमोदक: मेहरून्नीसा खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक ४/७/२००९ रोजी झालेल्या स्थायी समिती ठराव क्र.३२ नुसार अल्तमश कॉलनी येथील मंजूर रेखांकनातील सामाजिक सभागृह खाजगी व्यक्तींना भाड्याने देण्यासंबंधी सरदार अवतारसिंग सोधी यांच्या मंजुर रेखांकनातील स्थानिक प्लॉट धारकांनी सदरील सामाजिक सभागृह नागरिकांच्या वापरासाठी ठेवण्याची मागणी केल्यामुळे सदरील ठराव (ठराव क्र.३२ दि.४/७/२००९) रद्द करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो. सिल्लेखाना येथे मुख्य रस्त्यालगतची जुनी २५० मी.मी. व्यासाची आरसीसी ड्रेनेज लाईन काढून ४५० मी.मी. व्यासाची आरसीसी ड्रेनेज लाईन टाकणे अंदाजपत्रकीय रक्कम रू.९,६५,२२८/- चे काम श्री.शेख सलीम मोईयोद्यीन यांचेकडून करून घेत असतांना प्रत्यक्ष स्थळावर काम करतेवेळी सदरील ठिकाणी हार्ड स्ट्राटा असल्यामुळे ब्रेकर व जेसीबीद्वारे खोदकाम करून ड्रेनेज पाईपलाईन टाकण्यात आली. जेणे करून सदरील अंदाजपत्रकामध्ये रक्कम रू.३,१५,४४७/- इतकी वाढ झालेली आहे. तरी सदरील कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.१२,८०,६७७/- यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

करीता सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.१२,८०,६७७/- मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. सिल्लेखाना येथे मुख्य रस्त्यालगतची जुनी २५० मी.मी. व्यासाची आरसीसी ड्रेनेज लाईन काढून ४५० मी.मी. व्यासाची आरसीसी ड्रेनेज लाईन टाकणेचे मुळ अंदाजपत्रकीय र.रू.९,६५,२२८/- चे कामामध्ये रक्कम रू.३,१५,४४७/- ची वाढ झाल्याने रक्कम रू.१२,८०,६७७/- चे सुधारीत अंदाजपत्रकास तसेच वाढीव काम या कामाचे मुळ गुत्तेदार श्री.सलीम मोईयोद्यीन यांचेमार्फत करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. 28 नेहरूनगर अंतर्गत असलेल्या यासीन मस्जीदची गल्ली, एस.टी.कॉलनी मध्ये कॉंक्रीट रोडचे काम करणे अत्यंत आवश्यक आहे. या भागातील रस्त्यांची अत्यंत दुर्दशा झाली असून काम तातडीने करून घेणे गरजेचे आहे. दिनांक 21/12/2009 रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत एकुण 25.00 लक्षच्या कामास मान्यता मिळालेली असून यात सदर कामाचा समावेश आहे.

तरी वॉर्ड क्र. 28 मधील यासीन मस्जीदची गल्ली, एस.टी.कॉलनी या ठिकाणी रस्त्याचे कॉंक्रेटींग करण्याचे प्रत्येकी रू. 5.00 लक्ष चे काम (एकुण रू.10.00 लक्ष) तातडीने करून घेण्यासाठी मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदार श्री.शेख सलीम मोहीयोद्यीन यांचे मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

सुचक : मेहरून्नीसा खान अनुमोदक : सिताराम सुरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.28 नेहरूनगर अंतर्गत असलेल्या यासीन मस्जीदची गल्ली, एस.टी.कॉलनी मधील रस्त्यांची अत्यंत दुर्दशा झाली असून कॉंक्रीट रोडचे काम करणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे दिनांक 21/12/2009 रोजी सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानुसार वॉर्ड

क्र. 28 मधील यासीन मस्जीदची गल्ली, एस.टी.कॉलनी या ठिकाणी रस्त्याचे कॉंक्रेटींग करण्याचे प्रत्येकी रू. 5.00 लक्ष चे काम (एकुण रू.10.00 लक्ष) चे काम तातडीने करून घेण्यासाठी मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदार श्री.शेख सलीम मोहीयोद्यीन यांचे मार्फत अं.प.दरावर करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.28 नेहरूनगर अंतर्गत असलेल्या सदफ कॉलनी, युनुस कॉलनी या स्लम भागात तसेच त्रिमुर्तीनगर मंजूर लेआऊट मध्ये कॉंक्रीट रोडचे काम करणे अत्यंत आवश्यक आहे. या भागातील रस्त्यांची अत्यंत दुर्दशा झाली असून काम तातडीने करून घेणे गरजेचे आहे. दिनांक 21/12/2009 रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत एकुण 25.00 लक्षच्या कामास मान्यता मिळालेली असून यात सदर कामाचा समावेश आहे.

तरी वॉर्ड क्र. 28 मधील सदफ कॉलनी, युनुस कॉलनी व त्रिमुर्तीनगर या ठिकाणी रस्त्याचे कॉंक्रेटींग करण्याचे प्रत्येकी रू. 5.00 लक्ष (एकुण रू.15.00 लक्ष) चे काम तातडीने करून घेण्यासाठी मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदार श्री.बारी मोहम्मद वसीम यांचे मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

सुचक : मेहरून्नीसा खान अनुमोदक : सतीश कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.28 नेहरूनगर अंतर्गत असलेल्या सदफ कॉलनी, युनुस कॉलनी या स्लम भागात तसेच त्रिमुर्तीनगर मंजूर लेआऊट मधील रस्त्यांची अत्यंत दुर्दशा झाली असून कॉंक्रीट रोडचे काम करणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे दिनांक 21/12/2009 रोजी सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानुसार वॉर्ड क्र. 28 मधील सदफ कॉलनी, युनुस कॉलनी व त्रिमुर्तीनगर या ठिकाणी रस्त्याचे कॉंक्रेटींग करण्याचे प्रत्येकी रू. 5.00 लक्ष (एकुण रू.15.00 लक्ष) चे काम तातडीने करून घेण्यासाठी मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदार श्री.बारी मोहम्मद वसीम यांचे मार्फत अं.प.दरावर करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा वॉर्ड क्र.९६ मध्ये जलवाहिनी टाकण्यासाठी मनपा अर्थसंकल्प २००९-१० मध्ये पान क्र.SCR-F-4 वर अ.क्र. 6 व 7 वर प्रत्येकी 5-5 लक्षची आर्थिक तरतुद करण्यात आलेली असून सदरील दोन्ही तरतुदीतून सिल्कमील मील कामगार हौसिंग सोसायटी व हमीद कॉलनी येथे जाणारी 4 व 6 इंची ए.सी. जलवाहिनी लाईन फार खराब झालेली असून पाणी पुरवठा वितरण व्यवस्था पुर्णतः विस्कळीत झालेली असल्याने रहिवासीयांना पिण्याचे पाण्याचा फार त्रास होत आहे. करिता या ठिकाणी त्वरीत नवीन 4 व 6 इंची सी.आय. लाईन टाकणे अत्यंत गरजेचे आहे. जेणे करून रहिवासीयांना होणारा पाण्याचा त्रास दुर होण्यास मदत होईल.

करीता सदरील काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदार मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

सुचक : मोमीन सफिया फिरदौस अनुमोदक : मेहरून्नीसा खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा वॉर्ड क्र. ९६ मध्ये जलवाहिनी टाकण्यासाठी अर्थसंकल्पातील उपलब्ध असलेल्या 5-5 लक्ष तरतुदीस अनुसरून सिल्कमील मील कामगार हौसिंग

सोसायटी व हमीद कॉलनी येथे जाणारी 4 व 6 इंची सी.आय. जलवाहिनी टाकणेचे काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदार मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ७७ अंतर्गत म्हाडा कॉलनी येथे पथदिवे व विद्युत पोलची व्यवस्था करणे आवश्यक आहे. रात्रीचे वेळी अंधारामुळे नागरीकांना असुविधा होत असून चोरी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदरचे काम तातडीने करून घेणे आवश्यक आहे. म्हाडा कॉलनी येथे पथदिवे व्यवस्था करणे या कामासाठी रू.५,००,६००/- व विविध ठिकाणी पोलसह विद्युत व्यवस्था करणेच्या कामासाठी रू.४,९९,९८०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरचे काम तातडीने करून घेण्याकरीता मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.७७ म्हाडा कॉलनी येथे पथदिवे व्यवस्था करणे - रू.५,००,६००/-

२. वॉर्ड क्र.७७ म्हाडा कॉलनी येथे विविध ठिकाणी पोलसह विद्युत व्यवस्था करणे-रू.४,९९,९८०/-

करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : सतीश कटकटे　　　　अनुमोदक : मोमीन सफिया मोमीन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ७७ अंतर्गत म्हाडा कॉलनी येथे पथदिवे व विद्युत पोलची व्यवस्था करणे आवश्यक असल्याने म्हाडा कॉलनी येथे पथदिवे व्यवस्था करणे रू.५,००,६००/- व विविध ठिकाणी पोलसह विद्युत व्यवस्था करणेच्या कामासाठी रू.४,९९,९८०/- चे अंदाजपत्रकास अनुसरून सदरचे काम तातडीने करून घेण्याकरीता मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियामनुसार कार्यवाही करावी.

१. वॉर्ड क्र.७७ म्हाडा कॉलनी येथे पथदिवे व्यवस्था करणे - रू.५,००,६००/-

२. वॉर्ड क्र.७७ म्हाडा कॉलनी येथे विविध ठिकाणी पोलसह विद्युत व्यवस्था करणे-रू.४,९९,९८०/-

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, रहिवाश्यांच्या सुविधोसाठी खालील दर्शविलेली कामे तातडीने करणे आवश्यक आहे. नागरीकांना होणारा त्रास दुर होण्यासाठी खाली नमुद केलेली कामे तातडीने करून घेण्याकरीता मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र. २९ शबीस्तान कॉलनी येथे कॉंक्रेटींग करणे. - ५.०० लक्ष

२. अहबाब कॉलनी मंजूर ले-आऊट मध्ये डांबरीकरण करणे. - ५.०० लक्ष

३. आरिश कॉलनी मध्ये कॉंक्रेटींग करणे. - ५.०० लक्ष

४. गणेश कॉलनी अंतर्गत गल्ल्यात कॉंक्रेटींग करणे. - ५.०० लक्ष

५. गणेश कॉलनी मुख्य गल्ल्यात कॉंक्रेटींग करणे. - ५.०० लक्ष

सुचक : मेहरून्नीसा खान　　　　अनुमोदक : मोमीन सफिया फिरदौस

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रहिवाश्यांच्या सुविधोसाठी व नागरीकांना होणारा त्रास दुर होण्यासाठी खाली नमुद केलेली कामे विविध ठिकाणी तातडीने करून घेण्याकरीता मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

१. वॉर्ड क्र. २९ शबीस्तान कॉलनी येथे कॉंक्रेटींग करणे. - ५.०० लक्ष
२. अहबाब कॉलनी मंजूर ले-आऊट मध्ये डांबरीकरण करणे. - ५.०० लक्ष
३. आरिश कॉलनी मध्ये कॉंक्रेटींग करणे. - ५.०० लक्ष
४. गणेश कॉलनी अंतर्गत गल्ल्यात कॉंक्रेटींग करणे. - ५.०० लक्ष
५. गणेश कॉलनी मुख्य गल्ल्यात कॉंक्रेटींग करणे. - ५.०० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. २८८ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ६० सिल्लेखाना अंतर्गत छोटा तकीया व कैकाडीवाडा या ठिकाणी लहान लहान गल्ल्या असून त्यावरून जाणेयेण्याकरीता नागरीकांना सुविधा व्हावी यासाठी पेव्हर ब्लॉक बसविणे आवश्यक आहे. या कामासाठी सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात आर्थिक तरतुद उपलब्ध आहे. या भागातील नागरीकांचे तक्रारी असुन स.नगरसेविका यांची काम लवकर करण्याची मागणी आहे. वरील बाबी लक्षात घेता अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार खालील दर्शविलेली कामे मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.६० सिल्लेखाना मधील कैकाडीवाडा येथे पेव्हर ब्लॉक बसविणे - २.५० लक्ष
२.सिल्लेखाना प्रभागातील बडा तकीया भागात पेव्हर ब्लॉक बसविणे - २.५० लक्ष

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : मेहरून्नीसा खान अनुमोदक : मोमीन सफिया फिरदौस

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ६० सिल्लेखाना अंतर्गत छोटा तकीया व कैकाडीवाडा या ठिकाणी लहान लहान गल्ल्या असून त्यावरून जाणेयेण्याकरीता नागरीकांना सुविधा व्हावी यासाठी पेव्हर ब्लॉक बसविणे आवश्यक तसेच नागरीकांचे तक्रारी व स.नगरसेविका यांची काम लवकर करण्याची मागणी लक्षात घेता अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार खालील दर्शविलेली कामे मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

१. वॉर्ड क्र.६० सिल्लेखाना मधील कैकाडीवाडा येथे पेव्हर ब्लॉक बसविणे - २.५० लक्ष
२.सिल्लेखाना प्रभागातील बडा तकीया भागात पेव्हर ब्लॉक बसविणे - २.५० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद